लोकमत

# विजय ककडे यांच्या शोधनिबंधास अर्थशास्त्र परिषदेतर्फे पारितोषिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांनी सोलापूर येथे झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात शोधनिबंध सादर केला. त्यांच्या 'भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील वित्तीय समावेशकतेची आव्हाने' या शोधनिबंधास 'डॉ. रवींद्र सबनीस पारितोषिक व सन्मानपत्र' मिळाले आहे. डॉ. ककडे हे सातत्याने



'वित्तीय साक्षरता' या विषयाबर व्याख्याने देण्यासह लेखन करीत आहेत. भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळाचे (सेबी) तज्ज्ञ साधनव्यक्ती म्हणून त्यांनी ३०० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

लोकमत

# नेपाळचे कबड्डी संघ शिवाजी विद्यापीठात दाखल

## दक्षिण आशियाई स्पर्धेची तयारी करणार; प्रशिक्षण घेऊन सराव सामने खेळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** काठमांडू येथे यावर्षीची दक्षिण आशियाई स्पर्धा होणार आहे. त्यात सहभागी होणारे नेपाळच्या मुला-मुलींचे कबड्डी संघ सरावासाठी मंगळवारी शिवाजी विद्यापीठात दाखल झाले. विद्यापीठ आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांतील संघांसमवेत नेपाळचे संघ सराव करणार आहेत, प्रशिक्षण घेणार आहेत, अशी माहिती आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक रमेश भेंडीगिरी यांनी मंगळवारी दिली.

दक्षिण आशियाई स्पर्धा दि. १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. कबड्डीतील नवतंत्रज्ञान, कौशल्यांचे प्रशिक्षण घेण्यासह सराव आणि तयारी करण्याकरिता नेपाळमधील मुले आणि मुलींचा संघ शिवाजी विद्यापीठात आला आहे. मुलांच्या संघात १६, तर मुलींच्या संघामध्ये १४ खेळाडूंचा समावेश आहे. हे खेळाडू १८ ते २७ वयोगटातील आहेत. या संघांचा रोज सकाळी सराव घेतला जाईल.



दक्षिण आशियाई कबड्डी स्पर्धेच्या सरावासाठी कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात मंगळवारी नेपाळच्या मुलींचा संघ दाखल झाला. या संघाचा प्रशिक्षक उमा भोसले-भेंडिगिरी यांनी सराव घेतला.

कौशल्यांची माहिती दिली जाईल. त्यांना माझ्यासह उमा भोसले-भेंडीगिरी, ओंकार पायगुडे, सागर खटाळे, आदी मार्गदर्शन करतील. खेळातील गती आणि क्षमता वाढविण्याबाबत सुहास सोळंकी मार्गदर्शन करणार आहेत. दुपारनंतर या संघांचे सराव सामने घेण्यात येतील. विद्यापीठासह शाहू कॉलेज,

महाविद्यालय, आदींसमवेत सामने होतील. नेपाळमधील दोन्ही संघ मंगळवारी दुपारी विद्यापीठात दाखल झाले आहेत. विद्यापीठातील क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडासंकुलात प्रशिक्षण सुरू झाले. दि. २१ नोव्हेंबरला हे संघ मुंबईला रवाना होतील, असे प्रशिक्षक भेंडीगिरी यांनी

### संघांना वेगळा अनुभव, ज्ञान

यापूर्वी तीन वेळा थायलंडचा कबड्डी संघ सरावासाठी शिवाजी विद्यापीठात आला होता. येथील सरावाचा या संघांना चांगला उपयोग झाला. अन्य देशांतील संघ विद्यापीठात सरावासाठी आल्याने दोन्ही देशांतील संघांमध्ये एकमेकांचे ज्ञान, खेळातील तंत्र, कौशल्यांबाबतच्या माहितीचे आदानप्रदान होते आणि अनुभव मिळतो, असे प्रशिक्षक भेंडीगिरी यांनी सांगितले.

“ संघांची भक्कम तयारी करण्याच्या उद्देशाने आम्ही विविध ठिकाणच्या संघांसमवेत सराव करीत आहोत. त्याअंतर्गत शिवाजी विद्यापीठात आलो आहोत. याठिकाणी नवीन कौशल्य, ज्ञान आमच्या खेळाडूंना निश्चितपणे मिळेल.

**- कृष्णदेव पानता,**
संघव्यवस्थापक, नेपाळ.

लोकमत



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात झालेल्या विद्यापीठअंतर्गत महाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकाविलेल्या कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयास उपकुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

# आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत 'शाहू'ची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय महिला कबड्डी स्पर्धेत ४७-२४ असा पराभव करीत विजेतेपद पटकाविले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागातील मॅटवर झालेल्या या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा येथील महाविद्यालयांचा समावेश होता. उपांत्य सामन्यात कोल्हापूरच्या शाहू छत्रपती महाविद्यालयाने वाईच्या किसन वीर महाविद्यालयाचा ३९ विरुद्ध दोन गुणांनी एकतर्फी मात करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. अटीतटीच्या अंतिम फेरीत इस्लामपूर संघाचा ४७-२४ असा पराभव करीत विजेतेपदाला सहाव्यांदा गवसणी घातली. विजयी संघामध्ये मृणाली टोणपे, वसुंधरा माने, प्रतीक्षा पिसे, प्राजक्ता देसाई, प्राजक्ता पाटील, स्नेहल शिंदे, गायत्री पाटील, बसुधा माने, अमृता सांगले, स्मिता शिंदे, श्यामल पाटील यांचा समावेश होता. या संघाला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडीगिरी, शुभदा माने यांचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-6 NOV 2019
तरुण भारत

# शाहू कॉलेजने पटकावले अजिंक्यपद

## शिवाजी विद्यापीठातर्फे आंतरविभागीय विभागीय मुलींच्या कबड्डी स्पर्धा : इस्लामपूरचे केआरपी महाविद्यालय उपविजेते

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर विभागापाठोपाठ शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मुलींच्या कबड्डी स्पर्धेचेही कोल्हापुरातील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजने मंगळवारी विजेतपद पटकावले. एकतर्फी झालेल्या अंतिम सामन्यात यजमान शाहू कॉलेजने इस्लामपूरच्या केआरपी महाविद्यालयावर ४७-२४ गुण फरकांनी विजय मिळविला. तिसऱ्या क्रमांकासाठी आजरा येथील आजरा महाविद्यालय व वाई (जि. सातारा) येथील किसनवीर महाविद्यालय यांच्यात चुरशीने सामना खेळला गेला. यात आजराने किसनवीरवर ३७-३६ गुणफरकाने विजय मिळविला. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभाग हॉलमधील अत्याधुनिक मॅटवर ही स्पर्धा झाली.

स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात केआरपी महाविद्यालयाने आजरा महाविद्यालयावर ३५-२५ गुणफरकांनी विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात शाहू कॉलेजने किसनवीर महाविद्यालयाला ३९-२ गुणफरकांनी हरवून अंतिम फेरीत पोहचले.



कोल्हापूर : शाहू कॉलेजला गौरविताना विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एन. शिंदे. शेजारी (डावीकडून) बाबासाहेब उलपे, प्रा. अण्णा गावडे, प्रा. विक्रमसिंह नांगरे-पाटील, पी. टी. गायकवाड, रमेश भेंडिगिरी, अजित पाटील आदी.


स्पर्धेच्या बक्षीस वितरण शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते स्पर्धा विजेत्या शाहू कॉलेजला फिरती ढाल व कायमस्वरुपी चषक देऊन गौरविण्यात आले. यानंतर शिवाजी विद्यापीठ संघ निवडीसाठी प्राथमिक चाचणी घेण्यात आली. यातून २० खेळाडू शिवाजी विद्यापीठ संघ निवड व सराव शिबिरासाठी निवडण्यात आले. लवकरच शिबिराचे आयोजन करुन त्यातून शिवाजी विद्यापीठ संघ जाहीर केला जाईल. हा संघ पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धेत सहभागी केला जाईल, असे शिवाजी विद्यापीठ बोर्ड ऑफ स्पोर्टसूचे सदस्य डॉ. बाबासाहेब उलपे यांनी सांगितले. यावेळी शिवाजी विद्यापीठ बोर्ड ऑफ स्पोर्टसूचे सदस्य प्रा. संभाजी पाटील, प्रा. अण्णासाहेब गावडे, विद्यापीठ क्रीडा संचालक पी. टी. गायकवाड, शाहू संजय पाटील, अजित पाटील, शुभदा माने, जी. एम. लवंगारे, अतुल टोणे, चंद्रशेखर शहा, शाहू कॉलेज कबड्डी संघाचे प्रशिक्षक रमेश भेंडिगिरी यांच्यासह शुभदा माने उपस्थित होत्या.

**विजयी शाहू कॉलेज संघातील खेळाडूंची नावे-**

मृणाली टोणपे, वसुंधरा माने, प्रतिक्षा पिसे, प्राजक्ता देसाई, प्राजक्ता पाटील, स्हेनल शिंदे, गोपिका इळके, गायत्री पाटील, वसुधा माने, अमृता सांगले, स्मिता शिंदे, शामल पाटील

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 6 NOV 2019
तरुण भारत

# डॉ. ककडे यांच्या संशोधनाला डॉ. रवींद्र सबनिस पारितोषिक



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांच्या संशोधनाला 'डॉ. सबनिस पारितोषिक व सन्मान पत्र' देऊन गौरवण्यात आले. हा गौरव सोहळा सोलापूर येथे झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात पार पडला. डॉ. ककडे यांनी 'भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील वित्तीय समावेशकतेची आव्हाने' या विषयावर संशोधनपर लेख लिहला आहे. तसेच ते सातत्याने वित्तीय साक्षरता या विषयावर व्याख्याने व लिखान करीत असतात. भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सेबी)च्या तज्ज्ञ साधन व्यक्ती म्हणून आतापर्यंत त्यांनी ३०० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी अभिनंदन केले.